संचालनालय लेखा व कोषागार
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
30 SEP 2026
प्राप्त झाले सही.........................

सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्री. जितेंद्र चंद्रकांत आरेकर, लेखा अधिकारी.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-2026/प्र.क्र.149/E-1797004/कोषा प्रशा -2
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- 400 032.
दिनांक : 22 सप्टेंबर, 2026.

संदर्भ 1) सहसंचालक (प्रशासन) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको/प्रशा-राप/का.6/श्री. आरेकर/7.26/933/789/3712, दि.17.07.2026
2) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्र. 3494/क्र.1, दि. 04.03.2026
3) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/रोख/कार्या-1/जितेंद्र आरेकर/प्रतिक्षाधीन/03-2026/134, दि. 09.03.2026
4) क्र. अलेका/आस्था-1/ब/नस्ती क्र.132/228 दि. 08.04.2026
5) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/प्रशा-राप/का-2/2026/ लेअ/710, दि. 03.06.2026
6) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/रोख/कार्या-1/श्री. जितेंद्र आरेकर/प्रतिक्षाधीन/06-2026/309, दि.05.06.2026
7) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेवको/प्रशा-राप/का-6/रजा/ 7.26/915, दि. 16.07.2026
8) प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पूर्व) यांचे आदेश क्र. 201/प्रापका/मु.(पु)/ आस्था/2026/ जा.क्र.4336, दि. 08.06.2026

220

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. जितेंद्र चंद्रकांत आरेकर, लेखा अधिकारी, यांची सेवा महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे संदर्भ क्र.2 येथील आदेशान्वये संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्याकडे दि.04.03.2026 (म.नं.) पासून प्रत्यार्पित करण्यात आली होती.

2. श्री. आरेकर यांना दि.०५.०३.२०२६ (म.पू) पासून संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयात प्रतिक्षाधीन लेखा अधिकारी म्हणून रुजू करुन घेण्यात आले. त्यांची सेवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयास वर्ग करण्यात आली.

3. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे आदेश दि.०८.०४.२०२६ अन्वये श्री. आरेकर यांना दि.१०.०३.२०२६ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले व त्यांच्याकडे प्रथम प्रदान निवृत्तीवेतन शाखेचा कार्यभार सोपविण्यात आला.

4. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या दि.०३.०६.२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. आरेकर यांना

01876/2026/2492
30.9.2026

रक्तुन
30/9/26

लेखा अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, (पूर्व विभाग), वडाळा, मुंबई या पदावर पदस्थापना देण्यात आली. त्यानुसार श्री. आरेकर यांना संचालनालयाच्या दि.०५.०६.२०२६ रोजीच्या आदेशान्वये लेखा अधिकारी, परिवहन कार्यालय, पूर्व विभाग, वडाळा, मुंबई येथे रुजू होण्यासाठी संचालनालयातून दि.०५.०६.२०२६ (म.नं.) कार्यमुक्त करण्यात आले.

5. श्री. आरेकर यांची दि.११.०३.२०२६ ते दि.०२.०४.२०२६ एकूण २३ दिवसाची परिवर्तित रजा, तसेच दि.२७.०४.२०२६ ते दि.३०.०४.२०२६ पर्यंतची एकूण ०४ दिवसाची अर्जित रजा संदर्भीय क्र. 7 येथील दि. 16.07.2026 रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आली आहे.

6. श्री. जितेंद्र आरेकर हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) या कार्यालयात दि.०५.०६.२०२६ (म.नं.) रुजू झाले आहेत.

7. श्री. आरेकर यांचा सक्तीच्या प्रतिक्षाधीन कालावधीचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.05.03.2026 ते 09.03.2026 | 05 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत (सचालनालयात कार्यरत) |
| दि.10.03.2026 | 01 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत (अधिदान व लेखा कार्यालयात कार्यरत) |
| दि.11.03.2026 ते 02.04.2026 | 23 दिवस | परिवर्तीत रजा मजूर |
| दि.03.04.2026 ते 26.04.2026 | 24 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत (अधिदान व लेखा कार्यालयात कार्यरत) |
| दि.27.04.2026 ते 30.04.2026 | 04 दिवस | अर्जित रजा मजूर |
| दि.01.05.2026 ते 03.06.2026 | 34 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत (अधिदान व लेखा कार्यालयात कार्यरत) |
| दि.04.06.2026 ते 05.06.2026 | 02 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत (सचालनालयात कार्यरत) |
| एकूण | 93 दिवस | |

8. श्री. आरेकर यांना महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, विधान भवन, मुंबई कार्यालयाने कार्यमुक्त केल्यानंतर ते दि. 05.03.2026 रोजी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयात रुजू झाले होते व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.20.02.2008 मधील तरतूदीनुसार श्री. आरेकर यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

9. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्री. जितेंद्र चंद्रकांत आरेकर यांचा दिनांक 05.03.2026 ते दिनांक 05.06.2026 पर्यंत मंजूर रजा कालावधीसह एकूण 93 दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

10. सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, (पूर्व विभाग), वडाळा, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

Digitally signed by
Rupali Sanjog Kabare
Date: 29-09-2026
15:00:01

(रुपाली कबरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
... महालेखापाल 1/2, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.*

2) सचालक, लेखा व कोषागारे सचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुबइ,
3) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
4) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
5) श्रीम. जितेंद्र चंद्रकांत आरेकर, लेखाधिकारी *
6) लेखा अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, (पूर्व विभाग), वडाळा, मुंबई,*
7) निवड नस्ती, कोषा प्रशा -2,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

"निर्गमित"